ब) महाराष्ट्र सुवर्णमहोत्सवी नागरी दलितवस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजना

| | | |
|---|---|---|
| १ | योजनेचे नाव | महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजना |
| २ | योजना केव्हा पासून सुरु आहे | महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत राज्याच्या नागरी भागातील अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांमधील कुटुंबियांना खाजगी नळ जोडण्या व वैयक्तिक शौचालये उपलब्ध करुन देण्यासाठी नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजना नियमित राबविण्याचा निर्णय दिनांक २५ जून, २०१० च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे. |
| ३ | योजना/ कार्यक्रमाचे उद्दिष्ट | शासन निर्णयात विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार या योजनेअंतर्गत नागरी अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांमधील लाभार्थींचा प्राधान्यक्रम निश्चित करतांना शहरातील दलित वस्तीमधील दारिद्ररेषेखालील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांमधील कुटुंब, इतर अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांमधील कुटुंब व इतर भागात निवास करणारे अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांमधील कुटुंब याप्रमाणे करण्यात येईल. तथापि, प्रकल्प प्रस्ताव तयार करतांना या सर्व अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांमधील कुटुंबीयांना समाविष्ट करण्यात येईल. या योजनेंतर्गत प्रकल्प किंमतीच्या ९०% शासकीय अनुदान अनुज्ञेय असून १०% रक्कम संबंधित लाभार्थी किंवा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी उपलब्ध करुन द्यावयाची आहे. |
| ४ | निधी उपलब्धता/स्त्रोत | • राज्य शासन योजना<br>• या योजनेअंतर्गत नागरी भागातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांमधील कुटुंबियांना खाजगी नळ जोडण्या व वैयक्तिक शौचालये उपलब्ध करुन देताना खाजगी नळ जोडण्यांसाठी रु.४,०००/- प्रतिकुटुंब आणि वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी रु.१२,०००/- प्रतिकुटुंब याप्रमाणे अनुदान अनुज्ञेय आहे. |
| ५ | योजनेचे/कार्यक्रमाचे ठळक वैशिष्टय | नागरी क्षेत्रातील अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांमधील कुटुंबियांना खाजगी नळ जोडण्या व वैयक्तिक शौचालये उपलब्ध करुन देणे. |
| ६ | योजना/कार्यक्रमाचे भौतिक/आर्थिक साध्य | या योजनेअंतर्गत आतापर्यंत १२८ नागरी स्थानिक संस्थांच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आलेली आहे. यामध्ये १८७६७ खाजगी नळ जोडणी, ३९३२६ वैयक्तिक शौचालये आणि ५२६२३ खाजगी नळ जोडणी वा वैयक्तिक शौचालयांचा समावेश आहे. तसेच उर्वरीत नागरी स्थानिक संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात येत असून प्राप्त प्रस्तावांना राज्यस्तरीय समितीच्या बैठकीत मंजूरी देण्यात येते. |

मा.मंत्रीमंडळाच्या दिनांक १९.३.२०१५ रोजी झालेल्या बैठकीमधे, स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत शौचालयांच्या कामाचा समावेश केला असल्याने, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत राज्यात महाराष्ट्र सुवर्णमहोत्सवी नागरी दलितवस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजनेअंतर्गत नागरी भागातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांना शौचालयाचे बांधकाम करण्यासाठी राज्याच्या निधीमधून प्रतिकुटुंब रु.१२,०००/- प्रमाणे अनुदान देण्याची सुरु असलेली योजना बंद करण्यास मान्यता देण्यात आली. तथापि, या योजनेमध्ये सुरु असलेली कामे पूर्ण करण्यात यावीत, असा निर्णय घेण्यात आला आहे.

---------